# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 22/10/2021 (शुक्रवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 700 मी. अंतरावरील मौजा शारदा चौक कुही मज्जीद जवळ येथे दिनांक 21/10/2021 चे 00.01 वा. ते 03.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– देवानंद गुदरसा सोनी, वय 48 वर्ष, रा. वार्ड नं. 10 कुही ता. कुही जि. नागपुर यांचे दुकानाचे शटरचे लॉक पुर्ववत लागलेले होते. परंतु शटर मधातुन उचलुन वाकवुन दिसले. त्यावर फिर्यादीने दुकान उघडुन चोरी झाली का पाहिले असता, कोणतेही सामान चोरी झाल्याचे दिसले नाही. नंतर फिर्यादी यांना माहित पडले की, कुही येथील शारदा चौकातील राधोर्ते यांचे सोन्या–चांदीचे दुकान अज्ञात आरोपीने फोडण्याचा प्रयत्न करीत असतांना पोलीसांची गाडी तिथे आल्याने चोर पळुन गेले. फिर्यादीचे दुकानात सुध्दा चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380, 511 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री देविदास ठमके मो. नं. 8788553139 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील सुर्या सुपर इलेक्ट्रीकल कंपनी एम.आय.डी.सी. बोरी येथे दिनांक 20/10/2021 चे 18.30 ते 19.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मनिष रामुजी डवरे, वय 38 वर्ष, रा. प्रसाद कॉलनी बुटटीबोरी हे सुर्या सुपर इलेक्ट्रीकल कंपनीचे सर्व्हिस मॅनेजर म्हणुन काम करीत असुन दि. 21/10/2021 रोजी सकाळी 09.30 वा. कंपनीत आले असता त्यांना कंपनीचे खिडकीची ग्रील कापलेली दिसली व कंपनीत ठेवलेल्या जुन्या मोटारचे तांब्याचे तार 80 किलो अंदाचे किंमती 60,000/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेल्याचे दिसले. तपासा दरम्यान आरोपी क्र. 1) नंदकिशोर मोरेश्वर बोरजे वय 31 वर्ष, रा. तुरकमारी, 2) जितेन्द्र रतन शेंडे वय 27 वर्ष, रा. जवाद ले–आउट बुट्टीबोरी, 3) जितेन्द्र जगदीश सेंगर वय 30 वर्ष, रा. वटेघाट, 4) आषिश प्रभुनाथ सिंह, वय 30 वर्ष, रा वटेघाट व 5) संदिप विठ्ठल वाटमोडे वय 36 वर्ष, रा. सुकळी यांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार शैलेन्द्र नागरे मो.क्र. 7743919809 हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 15 कि मी अंतरावरील मौजा शिवपार्वती वेअर हाउस महादुला येथे दिनांक 31/03/21 चे 00.00 वा. ते 09/10/21 चे 13.30 वा. पर्यंत दरम्यान आरोपी नामे– गिरीश बाबुराव राहाटे (सहाय्यक सचीव धान खरेदी केंद्र महादुला) रा. तिलक वार्ड रामटेक याने त्याच्या अखत्यारीत असलेले शिवपार्वती वेअर हाउस महादुला येथील 5500 नग धानाचे कट्टे (प्रती 40 किलो) प्रमाणे 2200 क्विंटल एकुण कि. 56,49,600/–रु. चा मुद्देमालाचा ईतर सोबत फौजदारी पात्र न्यासभंग करून शासनाची फसवणुक केली आहे. तसेच स्वताच्या बचावासाठी पकडले जाउ नये या उद्देशाने सदरचे प्रकरण बदलुन ते धान चोरीचे स्वरूप आणुन त्याचा आधार घेत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्री. पंजाब सकरू चव्हाण वय 39 वर्ष रा. गौरव नगर रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 420, 409 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री विवेक सोनवणे मो.न. 9823017424 हे करीत आहे.

## अपत्य जन्माची लपवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. देवलापार :– अंर्तगत 03 कि. मी अंतरावर मौजा. निमटोला शेतशिवार येथे दि. 21/10/2021 चे 13.33 वा. सुमारास अनोळखी जन्मजात लहान बाळ (मुलगी) अंदाजे वय 1 ते 2 दिवस हिला तिचे अज्ञात आई वडिल यांनी फिर्यादिचे शेतातील उघडया झोपडीत जन्मजात लहान बाळ (मुलगी) हिचा परित्याग करण्याचा उददेशाने सोडुन दिले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गं.भा सुनिता हंसराज कुंभरे वय 40 वर्ष रा. निमटोला यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम 317 भादंवी अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक राकेश नलगुंडवार 9923701697 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. भिवापुर – दिनांक 20/10/2021 चे 10.00 वा. दिनांक 21/10/2021 चे ते 04.00 वा. चे सुमारास पो. स्टे. भिवापुर हद्यीत फिर्यादीयांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि शाळेत गेली असता शाळा सुटल्यावरही घरी परत आली नाही. फिर्यादी व नातेवाईकांनी भिवापुर तसेच शेजारील परीसरात तिचा शोध घेतला असता मिळुन आली नाही. तिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी भस्मे मो क 9764946808 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावरील खडक नदी ब्राम्हणी येथे दिनांक 21/10/21 चे 16.30 वा. दरम्यान फिर्यादीचा मुलगा नामे– चेतन सतीश चांदेकर (मृतक), वय 16 वर्ष, रा. इंदीरा झोपडपटटी वार्ड क्र. 12 कळमेश्वर हा गावातील मित्रासोबत खडक नदी येथे पोहण्याकरीता गेला असता त्याला पोहता येत नसल्याने नदीला पाणी जास्त असल्याने नदीचा पाण्यात बुडून मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सतीश विठ्ठल चांदेकर, वय 39 वर्ष, रा. इंदीरा झोपडपटटी वार्ड क्र. 12 कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास नापोशि तभाने मो क्र 8600458678 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत पिपळा डाग बंगला येथे नारायण भगवान गहुकर(मृतक), वय 65 वष रा. पिपळा डाग बंगला हे आपले शेतामध्ये कापुस वेचण्याचे काम करतात. तसेच दि 21/10/2021 रोजी दुपारी 15.30 वा. दरम्यान ते शेतातील कामानिमित्त शेतात जात असता खापरखेडा पिपळा डाग बंगला रेल्वे पोलजवळ त्यांना कंरट लागल्याने त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आशिष मारोती वाढ, वय 32 वर्ष, रा. वार्ड क्र. 4 पिपळा डाग बंगला यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ नामदेव धांडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर